महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विलंबाने अदा करण्यात येणाऱ्या मजुरीवरील नुकसानभरपाई (विलंब आकार) देण्यासाठी मुदतवाढ.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः मगांराग्रारोहयो-२०१४/प्र.क्र. १० /रोहयो-६ब
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ६ एप्रिल,२०१५

**संदर्भ -**

१. ग्राम विकास विभाग, केंद्र शासन, नवी दिल्ली यांची अधिसूचना (Notification), दि. ३ जानेवारी, २०१४
२. शासन परिपत्रक क्रमांकः मग्रारो-२०१४/प्र.क्र.५/पुर्नबां.७/२०१०/रोहयो-१०अ, दि. २० जानेवारी, २०१४.
३. विभागाचा शासन निर्णय क्रमांकः मगांराग्रारोहयो-२०१४/प्र.क्र.१०/रोहयो-६ब, दि. २६ फेब्रुवारी, २०१४.
४. विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: मगांराग्रारोहयो-२०१५/प्र.क्र. १०/रोहयो-६ब, दि. ३१ जुलै,२०१४

## शासन परिपत्रक-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मस्टर बंद झाल्यानंतर १५ दिवसांत मजुरी अदा करण्यात आली नाही तर मजुरीच्या प्रदानामध्ये होणाऱ्या विलंबासाठी मस्टर बंद झाल्यानंतर १६ व्या दिवसापासून प्रतिदिवस देय मजुरीवर ०.०५% नुकसानभरपाई वसुल करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कार्यपध्दती नवीन असल्याने व मजुरी प्रदानाच्या प्रणालीत सुधारणा करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर कालावधी देण्यात आला होता.तोपर्यंत विलंबाची रक्कम अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा भार शासनातर्फे सोसण्यास संदर्भाधीन दि. ३१ जुलै,२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दि. ३१/१२/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

यानुषंगाने राज्यस्तरावर आढावा घेतला असता काही ठिकाणी प्रलंबित हजेरीपत्रकांची संख्या जास्त असल्याची दिसून आले.तसेच, या योजनेंतर्गत काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रबोधन

होणेही आवश्यक असल्याने याकरिता एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्याबाबतचे निदेशही क्षेत्रिय स्तरावर देण्यात आले. यानुषंगाने विभागीय स्तरावर उप सचिव (रोहयो) यांनी काही विभागास भेटी देऊन आढावा घेतला असता अद्यापही क्षेत्रिय स्तरावर सदर प्रक्रीयेविषयी प्रबोधनाची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे.

सबब, संदर्भाधीन दि. ३१ जुलै,२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकात परिच्छेद **अ** मध्ये नमूद केलेल्या अंतिम दिनांकास या परिपत्रकान्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि. १ जानेवारी, २०१५ ते दि. ३० जून,२०१५ इतक्या सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत असून आता दि. १ जानेवारी, २०१५ ते दि. ३० जून,२०१५ पर्यंतच्या कालावधीतील विलंबाची रक्कम अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा भार राज्य शासन सोसेल. दि. १ जुलै,२०१५ पासून विलंबाची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून वसुल करण्यात येईल. तसेच, या मुदतीनंतर परत कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग.
6/4/2015

प्रत,

१. मा.मंत्री (रोहयो व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
२. सचिव (रोहयो व जलसंधारण) यांचे स्विय सहाय्यक.
३. आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
४. आयुक्त (मगांराग्रारोहयो), आयुक्त कार्यालय, नागपूर.
५. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर व उपनगर वगळून)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. उप सचिव (रोहयो) यांचे स्विय सहाय्यक.
८. उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
९. उप जिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
११. निवडनस्ती.